तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in

क्रमांक : १०/एनजीपी/२०१०/तक्रार/१५९०
दिनांक : २२.११.२०१०

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

विषय : विनाअनुदानित तंत्रनिकेतनातील कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांबाबत..
संदर्भ : शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्र. संकीर्ण २०१०/ (१५९/१०) तांशि २, दि. ३०.८.२०१०

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र कृपया पहावे. त्वरित संदर्भासाठी पत्राची सहपत्रांसह प्रत सोबत जोडत आहे.

संदर्भाधीन पत्रासोबतच्या टॅफनॅपच्या पत्रान्वये संघटनेने विनाअनुदानित तंत्रनिकेतनांतील कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांबाबत चर्चा करण्याबाबत मा. मंत्री महोदयांची वेळ मागितलेली आहे. टॅफनॅप संघटनेने त्यांच्या पत्रामध्ये खालील विविध मागण्या नमूद केलेल्या आहेत. निम्न नमूद मागण्यांच्या अनुषंगाने आपण आपल्या स्तरावरुन सर्व विनाअनुदानित तंत्रनिकेतनांना सूचना द्याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास कळविण्यात यावा.

१. विनाअनुदानित तंत्रनिकेतामधील प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीची अंमलबजावणी व फरकाची रक्कम मिळणेबाबत
२. महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी स्वतंत्र वेतनखाते काढणे अनिवार्य करणेबाबत.
३. विनाअनुदानित तंत्रनिकेतनांमधील कर्मचाऱ्यांकरीता ग्रॅच्युएटीची तरतूद करणे संस्था चालकांना अनिवार्य करण्याबाबत

आस्था- २

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.
-8 DEC 2010
आवक क्र. ९२६३९

(डॉ. सु.का. महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

जा.क्र.- विकापु/आस्था-२/माहिती/२०१०/ ११०१६
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे:-४११०१६.
दिनांक:- 18 DEC 2010

सोबत संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्र/सहपत्राची छायापत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी. त्यांना कळविण्यांत येते की, संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्रात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(बी.डी. मिसाळ)
प्रशासकीय अधिकारी
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रति:- प्राचार्य/संचालक सर्व अशासकीय विनाअनुदानित संस्था.
प्रत:- श्री. शिंदे प्रोग्रॅमर वि. का. पुणे यांना माहितीसाठी त्यांना कळविण्यांत येते की, संदर्भाधिन पत्र,सहपत्रासह या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यांत यावे.